**दिनांक ०१/०९/२०२३**

# <u>प्रेस नोट</u>

## आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या इसमाचा कक्ष-७, गुन्हे शाखेच्या पथकाने शोध घेऊन त्यास आत्महत्येपासुन परावृत्त करून त्याचे कुटुंबियांच्या ताब्यात दिलेबाबत

दिनांक ३१.०८.२०२३ रोजी एका इसमाने त्याच्या ई-मेल वरून तो विषारी इंजेक्शन घेऊन आत्महत्या करणार असल्याबाबत पोलीस आयुक्त कार्यालय तसेच इतर बॅंक कार्यालय, प्रसार माध्यमे इ. २०० पेक्षा जास्त मेल आयडीवर ई-मेल केला होता. सदर ई-मेल करणारा इसम हा कक्ष-७ कार्यक्षेत्रातील विक्रोळी पोलीस ठाणे हद्दीत रहावयास असल्याचे समजल्याने सदर इसमाचा ताबडतोब शोध घेण्याकरीता गुन्हे शाखेची दोन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. सदर गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद इसमाबाबत प्राप्त माहितीच्या आधारे त्याचे छायाचित्र प्राप्त करून त्याचा विक्रोळी परिसरामध्ये शोध घेण्यास सुरूवात केली परंतु त्याचा मोबाईल बंद येत होता व तो त्याचे ठिकाण सतत बदलत होता. तरी देखील इतर वेगवेगळया प्रकारे तपास करून त्याचा शोध घेतला असता नमुद इसम नामे अबक, वय २८ वर्षे यास महात्मा फुले हॉस्पीटल समोर, कन्नमवार नगर नं. २, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथुन ताब्यात घेतले. सदरवेळी त्याची अंगझडती घेतली असता त्याचेजवळ कोणत्याही प्रकारचे इंजेक्शन मिळुन आले नाही. त्यावेळी त्याचा मोबाईल तपासला असता तो गुगल मध्ये **"Death Injection"** या नावाने आत्महत्येसाठी विषारी इंजेक्शनाचा शोध घेत असल्याचे दिसुन आले. सदरवेळी त्यास विश्वासात घेऊन त्याचेकडे चौकशी केली असता असे समजले कि, त्याची नोकरी गेली होती व तो त्याचे कर्जाचे हप्ते भरू शकत नसल्यामुळे आलेल्या नैराश्येतुन तो आत्महत्या करणार होता.

एकंदरीत केलेल्या चौकशीवरून इसम नामे अबक, वय २८ वर्षे याने त्यास कर्जबाजारीपणामुळे आलेल्या नैराश्यातुन आत्महत्येचा विचार केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यास सोबत घेऊन त्याचे घरी विक्रोळी (पुर्व), मुंबई येथे जाऊन त्याच्या कुटुंबियांसमक्ष समुपदेशन करून त्यास आत्महत्येच्या विचारापासुन परावृत्त केले.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. राज तिलक रौशन, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-पुर्व) श्री. चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तावडे, पो.नि. सावंत, पो.उ.नि. काळे, पो.उ.नि. शेलार, पो.ह.क्र. ३२८०७/गुरव, पो.ह.क्र. ९६०६३३/बल्लाळ, पो.ह.चा.क्र. ९८०८०७/धुमाळ, पो. ह.क्र. ००३५१/शिरापुरी, पो.ह.क्र. ०३४६७/गलांडे यांनी पार पाडली आहे.